## प्रकरण दुसरे

# महाराष्ट्राचा एक अभ्यास

## प्रकरण दुसरे

# महाराष्ट्राच्या भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय विश्वाचा अभ्यास


२.१ महाराष्ट्राचे भौगोलिक विश्व

२.२ महाराष्ट्राचा सामाजिक अभ्यास

२.३ महाराष्ट्राचे आर्थिक विश्व

२.४ महाराष्ट्राचे सांस्कृतिक विश्व

२.५ महाराष्ट्राचे राजकीय विश्व

## २.१ महाराष्ट्र भौगोलिक विश्व :-

राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा।
नाजूक देशा, कोमल देशा, फुलांच्याही देशा।।

असे वर्णन असणारी आणि भारताच्या दख्खन पठारावर मध्यवर्ती भागात उत्तर भारत व दक्षिण भारत यांना एकत्रित करणारी विशाल भूमी म्हणजे महाराष्ट्र राज्य होय. महाराष्ट्रात विविध प्रदेशांत भौगोलिक विविधतेबरोबरच प्रादेशिक विविधता आढळते. ''१ मे १९६० रोजी विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राचा समावेश असलेल्या सलग महाराष्ट्राची निर्मिती झाली. महाराष्ट्राच्या स्थापनेच्या वेळी महाराष्ट्रात २६ जिल्हे आणि २३५ तालुके होते. सध्या महाराष्ट्रात ३५ जिल्हे व ३४३ तालुके आहेत. स्थानिक प्रशासनासाठी राज्याच्या ग्रामीण भागांत ३३ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या व २८५५३ ग्रामपंचायती आहेत, तर नागरी भागात २३ महानगरपालिका, २२१ नगर परिषदा, ४ नगरपंचायती व ७ कटक मंडळे आहेत.''[१]

महाराष्ट्र राज्याच्या भौगोलिक सीमा पाहता वायव्येस सातमाळा डोंगर रांगा, सातपुडा पर्वत रांगा, गालण टेकड्या आहेत. उत्तरेस सातपुडा पर्वतरांगा व त्यांच्या पूर्वेकडे गाविलगड टेकड्यांनी वेढलेला, तर ईशान्येस देरकसा टेकड्या, पूर्वेस चिरोली टेकड्या व भामरागड डोंगर रांगांची नैसर्गिक सीमा लाभलेला हा विस्तीर्ण प्रदेश आहे. दक्षिणेस हिरण्यकेशी नदी आणि कोकणात तेरेखोल नदी असून पश्चिमेला अरबी समुद्र आहे. ''महाराष्ट्राचे क्षेत्रफळ ३०७७१३ चौ.कि.मी. असून क्षेत्रफळाच्या दृष्टिकोनातून राजस्थान व मध्य प्रदेश यांच्यानंतर महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक आहे. महाराष्ट्राचा अक्षय वृत्तीय १५° ४४ उत्तर अक्षवृत्त ते २२° ६ उत्तर अक्षवृत्त असून रेखावृत्तीय विस्तार ७२° ३६ पूर्व रेखावृत्त आहे. ८०° ५४ पूर्व रेखावृत्त आहे. महाराष्ट्राची पूर्व-पश्चिम लांबी सुमारे ८०० कि.मी. असून दक्षिणोत्तर रुंदी सुमारे ७२० कि.मी. आहे.

महाराष्ट्राला वायव्येस गुजरात, उत्तरेस मध्य प्रदेश, पूर्वेस छत्तीसगड, आग्नेयेस आंध्र प्रदेश, दक्षिणेस कर्नाटक व गोवा राज्याच्या सीमा लाभल्या आहेत.''[२]

महाराष्ट्र राज्यात खानदेश, मावळ व कोकण हे प्राकृतिक प्रादेशिक विभाग आहेत. सह्याद्रीच्या पूर्व पठाराचा प्रदेश म्हणजे 'महाराष्ट्र पठार' किंवा 'देश' होय. सह्याद्रीच्या पूर्वेकडील उतारावर असलेल्या खोऱ्यांना 'मावळ' म्हणतात, तर सह्याद्रीच्या पश्चिम उतारापासून अरबी समुद्रापर्यंत असलेली अरूंद किनारपट्टी म्हणजे कोकण होय. या प्राकृतिक विभागाबरोबरच महाराष्ट्राच्या प्रादेशिक विभागामध्ये पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, विदर्भ, मराठवाडा व कोकण असेही विभाजन आढळते. प्रस्तर भंगातून बेसॉल्ट खडकांपासून निर्माण झालेला सह्याद्री पर्वत रांगेचा विस्तार, उत्तरेस तापी नदीपासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत झालेला आहे. या प्रदेशाला 'पश्चिम घाट' देखील म्हणतात. सह्याद्री पर्वताची एकूण लांबी सुमारे १६०० कि.मी. महाराष्ट्रातील लांबी ४४० कि.मी. व सरासरी १२०० मीटर ते १३०० मीटर उंचीची ही पर्वत रांग आहे. सह्याद्री पर्वतातील १६४६ मीटर उंचीचे कळसूबाई हे महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर अहमदनगर जिल्ह्यात आहे. त्याचबरोबर १५६७ मी. उंचीचे साल्हेर (नाशिक जिल्हा) व १४३८ मी. उंचीचे हरिशचंद्र गड (अहमदनगर) अशी प्रमुख शिखरे आहेत.

सह्याद्रीच्या मुख्य रांगेपासून पूर्वेकडील दिशेला गेलेल्या डोंगर रांगा सह्याद्रीला जेथे मिळतात तेथे भीमाशंकर, महाबळेश्वर, पाचगणी पठारे बनलेली आहेत. यालाच 'घाटमाथा' असे म्हटले जाते. सातमाळा- अजिंठा डोंगररांग गोदावरी-तापी नद्यांच्या खोऱ्यांना विभागते. हरिश्चंद्र-बालाघाट डोंगर रांग गोदावरी-भीमा नदी खोऱ्यांना विभागते, तर शंभू महादेव डोंगर रांग भीमा व कृष्णा नदी खोऱ्यांना विभागते. याशिवाय नंदुरबार जिल्ह्यात गाळण डोंगर, औरंगाबाद जिल्ह्यात वेरूळ डोंगर, नांदेड जिल्ह्यात मुदखेड डोंगर, नागपूर जिल्ह्यात गरमसुमर डोंगर, भंडारा जिल्ह्यात दरेकसा टेकड्या, गडचिरोली जिल्ह्यात चिरोली व सूरजागड डोंगर आहेत.

''सह्याद्री पर्वतांच्या पूर्वेस असलेला विशाल पठारी प्रदेश ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे लाव्हारसापासून निर्माण झाला. यालाच 'दख्खनचे पठार' असेही म्हणतात. या पठाराची पूर्व-पश्चिम लांबी सुमारे ७५० कि.मी. तर दक्षिणोत्तर रुंदी सुमारे ७०० कि.मी. आहे. महाराष्ट्र पठारावर तापी-पूर्णा खोरे, प्राणहिता खोरे, गोदावरी खोरे, कृष्णा खोरे इ. खोरी पाहावयास मिळतात. महाराष्ट्राच्या भूगर्भामध्ये आर्क्रियम खडक, धारवाड श्रेणीचे खडक, कडप्पा श्रेणीचे खडक, विंध्य श्रेणीचे खडक आणि गोंडवाना श्रेणीचे खडक आढळतात.''[३]

महाराष्ट्रातील नद्यांचे पूर्व वाहिनी व पश्चिम वाहिनी नद्या असे दोन प्रमुख विभाग पडतात. पूर्व वाहिनी नद्यांमध्ये गोदावरी, भीमा, कृष्णा या नद्यांचा समावेश होतो, तर पश्चिम वाहिनी नद्यांमध्ये उल्हास, सावित्रीसारख्या नद्यांचा समावेश होतो. पूर्व वाहिनी नद्या बंगालच्या उपसागराला तर पश्चिम वाहिनी नद्या अरबी समुद्राला जाऊन मिळतात. ''गोदावरी नदी ही महाराष्ट्रातील सर्वात लांबीची नदी असून ती नाशिक जिल्ह्यात त्र्यंबकेश्वरजवळ ब्रह्मगिरी डोंगरावर उगम पावते. गोदावरी नदी 'दक्षिण भारताची गंगा' म्हणूनही ओळखली जाते. महाराष्ट्रातील या नदीची लांबी ६६८ कि.मी. आहे. गोदावरीच्या मुख्य खोऱ्याने महाराष्ट्राचे ४९ टक्के क्षेत्र व्यापले असून नाशिक, नेवासा, पैठण व नांदेड ही महाराष्ट्रातील महत्त्वाची शहरे गोदावरीच्या काठावर वसली आहेत.''[४] महाराष्ट्राचे हवामान, वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक स्थान, विस्तार व प्राकृतिक रचनेमुळे मौसमी प्रकारचे आहे. कोकणातील हवामान सम स्वरूपाचे असते. त्याचबरोबर हवेत दमटपणा असतो. सह्याद्रीच्या पर्वत भागात आर्द्र व थंड तापमान असते. महाराष्ट्र पठाराचे हवामान उष्ण, विषम व कोरडे असते. महाराष्ट्रात पावसाळा, हिवाळा व उन्हाळा असे तीन प्रमुख ऋतू स्पष्ट जाणवतात.

महाराष्ट्रातील साधन संपत्तीतील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे मृदा होय. गोदावरी, भीमा, कृष्णा तसेच तापी नदीच्या खोऱ्यात आढळणारी सर्वात जास्त सुपीक

मृदा म्हणजे 'काळी मृदा' किंवा 'रेगूर मृदा' होय. ओलावा टिकवून धरण्याची जास्त क्षमता असणारी ही मृदा कापूस पिकासाठी उत्तम असते. टिटॅनीफेरम मॅग्नेटाईट व लोहामुळे या मृदेला काळा रंग प्राप्त होतो. याचबरोबर रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, कोल्हापूर या जिल्ह्यांत आणि घाटमाथ्यावरील डोंगराळ भागात जांभी मृदा आढळते. तसेच महाराष्ट्राच्या काही भागांमध्ये तांबडी मृदा आणि किनारी गाळाची मृदादेखील आढळते.

प्राकृतिक रचना व हवामान यावरून महाराष्ट्रातील शेतीचे अनेक प्रकार आहेत. त्यामध्ये ओलिताखालील शेती, आर्द्र शेती, बागायत शेती, कोरडवाहू अथवा जिरायत शेती, पायऱ्या-पायऱ्यांची शेती, स्थलांतरित शेती असे प्रकार पडतात. महाराष्ट्रात प्रामुख्याने खरीप व रब्बी हंगामात वेगवेगळ्या प्रकारची पिके घेतली जातात. ''खरीप हंगामात ज्वारी, बाजरी, तांदूळ, कापूस, तूर, भूईमूग, ऊस, तीळ, सूर्यफूल व सोयाबीनसारखी पिके घेतली जातात. महाराष्ट्रात सुमारे १३५ लाख हेक्टर क्षेत्र खरीप हंगामाखाली आहे. रब्बी हंगामात ज्वारी, गहू, हरभरा, करडई, जवस, भुईमूग, सूर्यफूल, मूग, मटकी इ.सारखी पिके रब्बी हंगामात घेतली जातात. महाराष्ट्रात सुमारे ६२ लाख हेक्टर क्षेत्रात रब्बी पिकांची लागवड केली जाते. कृषी आयुक्तालयाच्या पूर्वानुमानानुसार राज्यात २००९-१० या वर्षात अन्नधान्याचे एकूण उत्पादन १२१.२८ लक्ष मेट्रिक टन इतके होणे अंदाजित आहे.''[५] महाराष्ट्रातील प्रमुख अन्नधान्य पिके तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी आहे तर ऊस, कापूस, तंबाखू ही प्रमुख नगदी पिके आहेत. याचबरोबर भुईमूग, तीळ, सूर्यफूल, सोयाबीन ही प्रमुख तेलबिया पिके आहेत. महाराष्ट्रातील प्रमुख फळझाडे आंबा, नारळ, केळी, काजू, संत्री, द्राक्षे, मोसंबी, स्टॉबेरी, डाळिंब, बोर इत्यादी ओळखले जातात.

महाराष्ट्राच्या शेती व्यवसायाबरोबर पूरक व्यवसाय म्हणून पशूपालन व्यवसायाचा विकास झालेला दिसतो. २००८-०९ मधील कृषी क्षेत्राच्या स्थूल राज्य

उत्पन्नात या क्षेत्राचा हिस्सा सुमारे २४ टक्के होता. भारतातील पशुधनाचा विचार करता महाराष्ट्रात पशुधनाची घनता जास्त आढळते. महाराष्ट्रातील सहा जिल्ह्यांना ७२० कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभलेला आहे. महाराष्ट्रात खाऱ्या पाण्यातील व गोड्या पाण्यातील अशी दोन्ही प्रकारची मासेमारीचा व्यवसाय केला जातो. ''महाराष्ट्रातील शेती व्यवसाय प्रामुख्याने मान्सूनवर अवलंबून असल्याने त्याचे अनिश्चित स्वरूप पाहता शासनाने जलसिंचन साधनावर भर दिला आहे. महाराष्ट्रातील एकूण शेतजमिनीपैकी सुमारे १५ टक्के जमीन सिंचनाखाली आहे. सर्वाधिक जलसिंचन अहमदनगर त्यानंतर पुणे, सोलापूर, सातारा, नाशिक, जळगाव, औरंगाबाद या जिल्ह्यांमध्ये आहे.''[६] महाराष्ट्रात विहिरी, तलाव, उपसा, कालवे तसेच विविध पाटबंधारे प्रकल्पांद्वारे पाणीपुरवठा केला जातो.

महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळापैकी केवळ १२.३३ टक्के क्षेत्रामध्ये खनिज संपत्ती आढळते. यामध्ये मॅंगनीज, लोहखनिज, बॉक्साईट, क्रोमाईट, चुनखडी, डोलोमाईट, कायनाईट इ. समावेश होतो. चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, सिंधुदुर्ग, यवतमाळ, रायगड, रत्नागिरी, ठाणे व कोल्हापूर जिल्ह्याचे क्षेत्र खनिज क्षेत्र म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रात सुती वस्त्रोद्योग, साखर उद्योग, रसायन उद्योग, मोटारवाहन निर्मिती उद्योग, खनिजावर आधारित उद्योगधंदे इ. प्रकारचे उद्योग धंदे चालतात. याचबरोबर महाराष्ट्रातील विविध औद्योगिक विकास महामंडळे, मुंबईसारखे आंतरराष्ट्रीय बंदर वाहतूक व संदेशवहनाच्या आधुनिक सोयी-सुविधा, वित्तीय संस्था व महामंडळे, पाणी, वीज, रस्ते इत्यादी पायाभूत सुविधा आणि मुंबई, ठाणे, पुणे सारखी औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाची शहरे राज्याच्या औद्योगिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात.

''२००८-०९ राज्य वन अहवालानुसार महाराष्ट्रात ३१९३९ चौ.कि.मी. एवढे क्षेत्र वनाखाली असून ते राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या २१ टक्के इतके

आहे. देशाच्या एकूण वनक्षेत्राच्या तुलनेत ८ टक्के इतके आहे.'' महाराष्ट्रातील वाहतूक व्यवस्थेमध्ये रस्ते, वाहतूक, रेल्वे, जलवाहतूक आणि हवाई वाहतूक यासारख्या विविध घटकांचा व सेवांचा समावेश होतो. वाहतूक व्यवस्था ही पायाभूत सोई सुविधेतील महत्त्वाचा घटक असून ती राज्याच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावते.''[७]

''२०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ११.२३ कोटी इतकी आहे. राज्यात दर हजारी पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९२५ आहे. लोकसंख्येमध्ये महाराष्ट्र हे राज्य उत्तर प्रदेशनंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. २००१-२०११ या दशकामध्ये महाराष्ट्रात १५.९९ टक्के इतकी लोकसंख्येची वाढ झालेली दिसून येते. महाराष्ट्राची एकूण साक्षरता ८२.९१ टक्के एवढी आहे. सर्वात जास्त साक्षर जिल्हा मुंबई उपनगर असून त्याची साक्षरता ९०.९० टक्के इतकी आहे तर सर्वात कमी साक्षर जिल्हा नंदुरबार हा आहे.''[८]

## २.२ महाराष्ट्राचा सामाजिक अभ्यास :-

इंग्रजांच्या आगमगनाच्या वेळी भारत हा आर्थिक, सामाजिक व भौतिकदृष्ट्या अतिशय मागासलेल्या अवस्थेत होता. अंधश्रद्धा, परंपरागत चालीरीती, जातिव्यवस्था, परकोटीची सामाजिक विषमता, अस्पृश्यता, ब्राह्मणांचे समाजावरचे वर्चस्व, श्रीमंत क्षत्रियांची स्वार्थी स्वैराचारी वागणूक, स्त्रियांवर अनेक बंधनाच्या साखळ्या घालून त्यांना गुलामगिरीसारखी वागणूक होती, बालविवाह, जरठविवाह, बहुपत्नी विवाह, सतीची चाल, देवदासी यासारख्या कारणावरून जनावरासारखा स्त्रियांचा छळ करणे, विधवांना पुनर्विवाह अधिकार नसणे असे समाजाचे सर्रास चित्र होते. शिक्षणाची मक्तेदारी केवळ उच्चवर्गाचीच होती. जे काही पाठशाळेतून/ ब्राह्मणांच्या घरांतून शिक्षण दिले जाई ते परंपरागत पौर्वात्य पद्धतीचे होते. त्यावर धर्माचाच पगडा अधिक असे भौतिक ज्ञान-विज्ञानाचा त्यात अभाव होता म्हणून वैज्ञानिक दृष्टी समाजात नव्हती.

समाजातील अनेक दुष्ट प्रथा-परंपरा, रुढी, गतिहीन दृष्टिकोन, जातीभेद, ग्रंथ प्रामाण्यवाद, प्रारब्धवाद इत्यादींनी भारतीय समाजाच्या प्रगतीत अडथळे उभे केले होते. पण ते दूर करण्यासाठी समाजसुधारण्यासाठी प्रथम धार्मिक सुधारणांवर भर दिला. कारण एकूण समाजाची रचना ही धर्मावर आधारलेली होती. ''बंगालमधील एका सधन ब्राह्मण कुटुंबात जन्मलेले राजाराम मोहन रॉय अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्तेचे होते. त्यांनी 'ब्राह्मो समाजाची' स्थापना १८२८ मध्ये करून त्याद्वारे तीन सार समाज शिकवणीसाठी दिले. यामध्ये एकेश्वरवाद, मूर्तिपूजा अमान्य व सदाचार-नैतिकता-विश्वबंधुत्व त्यांनी या समाजात शिक्षणविषयक, स्त्री-दास्य विवेचनविषयक व जातिभेद निर्मूलनासाठी अथक परिश्रम घेतले व याचाच परिणाम म्हणजे १८७४ मध्ये ब्रिटीश शासनाने आंतरजातीय विवाहाला कायदेशीर मान्यता दिली.''[९]

महाराष्ट्रासुद्धा दादोबा तर्खडकर व दुर्गाराम मंछाराम मेहता या बुद्धिमंत कार्यकर्त्यांनी धर्म सुधारणेपासून समाजसुधारणा यासाठी एक नवा पंथ स्थापन करण्याचा निर्णय घेतला व यातूनच १८६७ मध्ये प्रार्थना समाजाची स्थापना केली. या समाजाच्या माध्यमातून जाती व्यवस्थेस विरोध, बाल विवाहास विरोध, विधवा विवाहा मान्यता, स्त्री शिक्षणाने स्त्रियांमध्ये जागृती व स्वावलंबन या चारी उद्दिष्टांचे स्वरूप धार्मिक पोपटपंचीपेक्षा विधायक कार्यावर भर देणारे होते. ''महाराष्ट्रात समाज सुधारणेच्या अग्रणी अत्यंत मोलाचे कार्य करणाऱ्यांमध्ये पुण्यातील क्षेत्रीय माळी कुटुंबात जन्मलेले महात्मा ज्योतिबा फुले यांनी १८७३ मध्ये ''सत्यशोधक समाजाची'' स्थापना केली. या समाजातील समाजसुधारकांनी शिक्षणाची सार्वत्रिकता, स्त्रीदास्य मुक्ती, स्त्रीशिक्षण, विधवांचे प्रश्न, जातिभेद व अस्पृश्यता निर्मूलन, शेतकऱ्यांचा उद्धार यासारखी महत्त्वाची कार्ये पार पाडली. ईश्वर एकच आहे, ईश्वर भक्ती सर्वांसाठी, व्यक्तीच श्रेष्ठ, ग्रंथांना श्रेष्ठत्व, सत्य व बंधुभाव, सदाचाराचा मार्ग इत्यादी समाजशिक्षणाचे मार्ग सांगितले.''[१०]

महाराष्ट्रात महर्षी अण्णासाहेब कर्व्यांनी स्वत: विधवेशी पुनर्विवाह करून समाजासमोर आदर्श ठेवला, त्यांनी पुण्याजवळ 'हिंगणे' येथे अनाथ बालिकाश्रमाची स्थापना केली. १९०७ मध्ये महाविद्यालयाची स्थापना केली. स्त्री शिक्षणाने परंपरा, धर्मांधता, कर्मठता यांच्या ओझ्याखाली दबलेली स्त्री ज्ञानी होऊ लागली. पुढे एस.एन.डी.टी. विद्यापीठ, समान संघ इत्यादी शैक्षणिक संस्था स्थापन करून शैक्षणिक चळवळ निर्माण केली. ''जातीभेद, अस्पृश्यता याविरूद्ध डॉ. बी. आर. आंबेडकरांनी दलित समाजात स्वाभिमान निर्माण करून त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराविरोधात त्यांना संघटित केले. अस्पृश्यता व दास्यातून / गुलामगिरीतून दायत्वातून सुटका करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. शिक्षण संस्थेचे जाळे विणले. नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश, महाडच्या चवदार तळ्याच्या पाणी ग्रहणासाठी सत्याग्रह करून त्यांनी दलितांच्या प्रश्नांकडे सर्वच भारतीयांचे लक्ष वेधले. अखिल भारतीय दलिताना त्यांनी 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' असा मूलगामी संदेश दिला.''[११] डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महान तत्त्वज्ञ, अर्थतज्ञ, राजनितितज्ञ व कायदेतज्ञ असल्यामुळे त्यांच्याकडे भारतीय राज्यघटना निर्माण करण्याचे काम सोपविल्या गेले त्यांनी परिवर्तनशील व परिदृढ अशी राज्यसत्ता राष्ट्राला बहाल केली. भारतीय राज्यघटना तयार करण्याचा मान बहाल केला. राष्ट्रीय एकात्मतेच्या आधारावर राज्यघटना तयार करून मोठे कार्य केले.

त्याचबरोबर छ. राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्रातील कार्ये म्हणजेच ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणावर भर, सक्तीचे व मोफत शिक्षण, स्त्री-शिक्षणाचा पुरस्कार, उच्च शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, जातीनिहाय वसतिगृहाची निर्मिती त्याचबरोबर जातिभेद व अस्पृश्यता निर्मूलनाकरिता भरीव कामगिरी केल्याचे आपणास आढळते. छ. शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्रातील भरीव कामगिरी पाहून त्यातून प्रेरणा घेऊन कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्था, डॉ. बापूजी साळुंखे यांनीदेखील विवेकानंद

शिक्षण संस्था यांचे संपूर्ण महाराष्ट्रभर जाळे विणले व शिक्षणाची गंगोत्री खेडोपाडी नेली.

संयुक्त महाराष्ट्र आपल्या स्थापनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. या निमित्ताने मे २०१० पासून राज्यभर अनेक कार्यक्रम झाले आणि मे २०११ पर्यंत ते चालतील. एखाद्या मोठ्या राज्यासाठी पन्नाशी ओलांडणे ही बाब मोठी नसली तरी त्या राज्याच्या विविध क्षेत्रांतील कामगिरीचे सिंहावलोकन करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरतो. प्रथमत: महाराष्ट्राच्या सामाजिक विश्वामध्ये शैक्षणिक विकासाचे महत्त्व अत्यंत आहे. 'शिक्षण' हा मानवी साधन संपत्तीच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. प्राथमिक शिक्षण हे पायाभूत शिक्षण असते. पाया पक्का असेल तरच वरची इमारत नीट उभी राहू शकते. महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणापूर्वी अंगणवाडी शाळा चालवल्या जातात. अंगणवाडीचे शिक्षण हे प्राथमिक शाळापूर्वी जवळपास तीन वर्षांचे असते. अंगणवाडी शाळेमध्ये मुख्यत: मुलाच्या विकासावर भर दिला जातो.

''महाराष्ट्रात खासगी संस्थांद्वारे मोठ्या प्रमाणात शाळा चालविल्या जातात आणि त्यातील बऱ्याच संस्थांना शासकीय अनुदान असते. याचबरोबर, स्थानिक संस्था, विश्वस्त संस्था, नगरपालिका, नगर समित्यांमार्फत त्या त्या भागात माध्यमिक शाळा चालविल्या जातात. खासगी किंवा जिल्हा परिषद व महानगरपालिकांकडून चालवल्या जाणाऱ्या शाळा या महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालेय प्रमाणपत्र मंडळ किंवा भारतीय शालेय प्रमाणपत्र परीक्षा समिती आणि माध्यमिक शिक्षणाचे केंद्रीय मंडळ (सेंट्रल बोर्ड सेकंडरी एज्युकेशन) यांच्याशी संलग्न असतात.''[१२] प्राथमिक शिक्षणास काही पूरक योजना राज्य सरकारतर्फे चालविण्यात येतात. त्यात 'सर्व शिक्षा अभियान' ही एक महत्त्वाची राष्ट्रीय योजना आहे व त्याबरोबर वस्तीशाळा, अहिल्याबाई होळकर योजना इ. योजनाही राज्य सरकारतर्फे चालवल्या जात आहेत. तसेच १९८६ सालच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात, भारतातील प्रत्येक जिल्ह्यात एक नवोदय विद्यालय स्थापण्याची

संकल्पना मांडली गेली. नवोदय विद्यालये पूर्णपणे निवासी स्वरूपाची अशी सह शिक्षण केंद्रे आहेत. तिथे उच्च माध्यमिक स्तरापर्यंतचे शिक्षण दिले जाते. महाराष्ट्रात आज ३२ जिल्ह्यांमध्ये ३२ नवोदय विद्यालये आहेत. याचबरोबर प्रौढ शिक्षणाच्या माध्यमातून १९८६ मध्ये राज्य साक्षरता मिशनची स्थापना करण्यात आली.

प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाबरोबरच अनौपचारिक शिक्षणासाठी अनेक विद्यापीठे, जागतिक पातळीवरील ख्याती मिळवलेल्या अनेक संशोधन संस्था, शैक्षणिक संस्था महाराष्ट्रात आहेत. देशाच्या वेगवेगळ्या भागांतून आणि विविध देशांतून अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी महाराष्ट्रात येत असतात. राज्यात एकूण ४ कृषी विद्यापीठे, १ आरोग्यशास्त्र विद्यापीठ, पशुशास्त्र विद्यापीठ, तंत्र महाविद्यालय व १२ बिगर कृषी विद्यापीठे आहेत. यात महिलांसाठी एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, संस्कृत भाषेचा अभ्यास, संशोधक व विकासासाठी कवी कुलगुरू कालिदास विद्यापीठ रामटेक येथे आहे. याशिवाय काही अभिमत विद्यापीठेही राज्यात आहेत. महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळामार्फत विविध प्रकारच्या परीक्षा आयोजित करण्याचे कार्य करते. यात प्राथमिक शिक्षणापासून ते शिष्यवृत्ती परीक्षा, डी.एड., बी.एड.सारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा या मंडळामार्फत आयोजित केल्या जातात. महाराष्ट्रातील माध्यमिक शिक्षणातील नियमनाच्या दृष्टीने १९७७ मध्ये महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची स्थापना करण्यात आली. माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षांचे आयोजन करणे हे मंडळाचे प्रमुख कार्य आहे. या मंडळाची पुणे, मुंबई, कोल्हापूर, नाशिक, अमरावती, नागपूर, औरंगाबाद व लातूर येथे विभागीय कार्यालये आहेत.

महाराष्ट्रात विविध जाती-धर्माचे लोक राहत असून त्यामध्ये प्रामुख्याने हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शिख, ख्रिश्चन, पारशी, जैन इत्यादी येतात. प्रत्येक धर्माच्या लोकांना एकमेकांविषयी आदर आहे. ''समाजातील दुर्बल घटकांच्या सामाजिक विकासासाठी

महाराष्ट्र शासनाने १९९३ मध्ये महिला व बालकल्याण विभागाची स्थापना केली. याचे मुख्यालय पुणे येथे असून महाराष्ट्रात युनिसेफ या आंतरराष्ट्रीय संस्थेतर्फे राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे नियोजन व नियंत्रणासाठी महिला व बालविकास विभाग हा मध्यवर्ती विभाग म्हणून जाहीर करण्यात आला.''[१३] या अंतर्गत महिला व बालविकासासंदर्भात विविध योजना राबवून विकास साधण्याचा प्रयत्न केला गेला आहे. तसेच स्त्रियांवरील अन्यायाचे निराकरण होऊन त्यांना विकासाची संधी उपलब्ध व्हावी यासाठी तसेच कायद्याची योग्य ती अंमलबजावणी व्हावी म्हणून २५ एप्रिल १९९३ रोजी 'महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची' स्थापना करून महिला सक्षमीकरणासाठी योजना राबविण्याचे कार्य शासन करत आहे.

महाराष्ट्रातील सामाजिक विकासाअंतर्गत युवा कल्याणावर भर देऊन राष्ट्रीय युवा धोरणांतर्गत युवकांसाठी विविध योजना सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येतात, याचबरोबर अनुसूचित जाती / जमातीच्या कल्याणासाठी त्यांच्यासाठी शैक्षणिक विकास व मागासलेपण दूर करण्यासाठी विविध आर्थिक महामंडळांची निर्मिती करण्यात आली आहे. ओ.बी.सी. व अल्पसंख्याक समाजाच्या विकासाकरिता घटनात्मक राज्य शासनामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. मागासवर्गातील दुर्बल घटकांबरोबरच अपंगाचे पुनर्वसन करण्यासाठी विशेष सोयी-सवलती शासनामार्फत राबविल्या जात आहेत.

## २.३ महाराष्ट्राचे आर्थिक विश्व :-

२००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ९.६९ कोटी होती. देशाच्या एकूण लोकसंख्येमध्ये महाराष्ट्राच्या लोकसंख्येचे प्रमाण ९.४ टक्के इतके आहे. मार्च २०११ रोजी महाराष्ट्राची लोकसंख्या सुमारे ११ कोटी इतकी झाली आहे. सध्या सर्वाधिक लोकसंख्येच्या बाबतीत उत्तर प्रदेशनंतर महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक लागतो. ''महाराष्ट्राचे क्षेत्रफळ ३.०८ लाख चौ.कि.मी. एवढे आहे. तर आजघडीला

महाराष्ट्राच्या लोकसंख्येची घनता ३२५ इतकी आहे. महाराष्ट्राचे नागरीकरण इतर राज्याच्या तुलनेत मोठ्या प्रमाणावर झाले आहे. याबाबतीत महाराष्ट्राचा तामिळनाडूनंतर दुसरा क्रमांक लागतो. तामिळनाडूची ४४% लोकसंख्या नागरी विभागांत राहते, तर महाराष्ट्राची ४२.४% लोकसंख्या नागरी विभागांत राहते. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या साक्षरतेचा दर ८२.९९% आहे. २००१ च्या जनगणनेनुसार हा दर ७६.८८ टक्के इतका होता.''[१४]

केंद्र शासनाने १९९१ मध्ये औद्योगिक धोरणामध्ये केलेल्या सुधारणा लक्षात घेऊन जास्तीत जास्त औद्योगिक गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी राज्य शासनानेही केंद्र सरकारच्या धर्तीवर आपल्या धोरणात मूलगामी बदल घडवून आणले. ''जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर स्थानिक विशेषतः सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना शासनाकडून मदतीची आवश्यकता आहे. कोणत्याही अर्थव्यवस्थेमध्ये उद्योगक्षेत्राला अतिशय महत्त्वाचे स्थान असते. म्हणजेच अल्पविकसित व विकसनशील अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये उद्योग क्षेत्र कळीची भूमिका पार पाडत असते. महाराष्ट्राचा विचार करता महाराष्ट्र हे भारतातील औद्योगिकदृष्ट्या एक पुढारलेले राज्य मानले जाते.''[१५] इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील उद्योगक्षेत्राचा अधिक विकास झाला आहे. राज्यातील महत्त्वाच्या उद्योगांमध्ये मोटार वाहने, अभियांत्रिकी वस्तू, पोलाद व लोखंडाचे ओतीव काम, विद्युत यंत्रे, औषधे, ट्रेलर्स, रसायने व रासायनिक उत्पादने, मूलभूत धातू, कोक व शुद्ध पेट्रोलियमची उत्पादने, अणुशक्ती इंधन, जडजवाहिरे आदी उद्योग गटांचा समावेश होतो.

राज्याने 'विशेष आर्थिक क्षेत्र' धोरण १० फेब्रुवारी २००६ पासून स्वीकारले आहे. उद्योगांना चालना देण्यासाठी आणि रोजगार निर्मितीसाठी या हेतूने 'विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ)' धोरण स्वीकारले. या क्षेत्रास करमुक्त बंधनमुक्त व पोषक व्यापार धोरण असेल याची काळजी घेतली आहे. यामुळे 'विशेष आर्थिक क्षेत्रातील' पायाभूत सुविधा व

उत्पादन क्षमता याकडे मोठ्या प्रमाणावर विदेशी तसेच स्थानिक गुंतवणूक आकर्षित होणे अपेक्षित आहे. ''२००९ अखेरपर्यंत २२५ प्रस्तावांचे प्रकल्प प्राप्त झाले असून १४४ प्रकल्पांना केंद्र सरकारने मान्यता दिली आहे तर ५८ प्रकल्प अधिसूचित झाले आहेत. मान्यताप्राप्त १४४ प्रकल्पांपैकी ५९ प्रकल्प माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील, १६ प्रकल्प बहुउत्पादनाचे आणि ५७ प्रकल्प एकल उत्पादनाचे आहेत.''[१६]

देशाच्या अर्थव्यवस्थेबरोबरच राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्येही निर्यातीला अनन्यसाधारण महत्त्व असते. महाराष्ट्राच्या होणाऱ्या निर्यातीमध्ये अलीकडील काळात सातत्यपूर्ण वाढ होत गेली आहे. ''२००८-०९ मध्ये महाराष्ट्राची निर्यात २,२६,७९४ कोटी रुपयांची होती. यामध्ये निरनिराळ्या उत्पादनांचा समावेश आहे. याचबरोबर औद्योगिकीकरणाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ १९६२ पासून कार्यरत आहे. महाराष्ट्राने औद्योगिक आजारपणाची समस्या हाताळण्यासाठी 'महाराष्ट्र राज्य वित्त महामंडळ' (MSFC) कार्यतर आहे.''[१७] महाराष्ट्र हे भारतातील आघाडीचे औद्योगिक राज्य असले तरी राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये शेतीचे महत्त्व अजूनही अबाधित आहे. २००१ च्या जनगणनेनुसार राज्यातील जवळपास ५५ टक्के लोकसंख्या उदरनिर्वाहाचे साधन म्हणून शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळेच उद्योग व सेवा क्षेत्राचा विकास होऊन शेती क्षेत्र आजही राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे.

''अर्थव्यवस्थेच्या वेगवान विकासासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवणुकीची आवश्यकता असते. परंतु हे भांडवल उपलब्ध करण्यात सार्वजनिक क्षेत्र दुर्बल ठरले असून सार्वजनिक क्षेत्राच्या मर्यादा समोर आल्या आहेत. सध्याचा काळ हा खासगीकरण-उदारीकरण-जागतिकीकरणाचा आहे. या काळामध्ये खासगी भांडवलाचे महत्त्व उत्तरोत्तर वाढत आहे. विशेषत: विदेशी भेट गुंतवणुकीचे (FDI) महत्त्व मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. देशाच्या पातळीवर इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात सर्वात जास्त विदेशी थेट

गुंतवणूक करण्यात आली आहे. देश पातळीवरील एकूण विदेशी थेट गुंतवणुकीपैकी २१ टक्के हिस्सा प्राप्त करून महाराष्ट्राने अग्रस्थान पटकावले आहे.''[१८]

अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टिकोनातून दळणवळणाच्या साधनाला आत्यंतिक महत्त्व आहे. कारण की शेतमाल, औद्योगिक माल, प्रवासी वाहतूकीच्या दृष्टिकोनातून राज्याचा आर्थिक विकास अवलंबून आहे. मार्च २००९ अखेर राज्यात एकूण रस्त्यांची लांबी २,३७,६६८ कि.मी. आहे. यामध्ये राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, प्रमुख व इतर जिल्हा व ग्रामीण रस्त्यांचा समावेश आहे. तसेच मार्च २००९ अखेरीस रेल्वे लोहमार्गांची राज्यातील लांबी ५९८२.८९ कि.मी. आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रामधील आंतरराष्ट्रीय विमानतळांची संख्या तीन आहे. मुंबई, नागपूर आणि पुणे या तीन शहरांत हे आंतरराष्ट्रीय विमानतळ आहेत. परंतु तरीही मुंबईच्या विमानतळावरून आंतरराष्ट्रीय देशांतर्गत विमान वाहतुक तुलनेने जास्त होते. महाराष्ट्रात आता औरंगाबाद, कोल्हापूर, नांदेड, जळगाव, यवतमाळ येथेही देशांतर्गत विमानतळ स्थापन करण्यात आले आहे. महाराष्ट्राला ७२० कि.मी. लांबीची सागरी किनारपट्टी लाभली आहे. राज्यामध्ये मुंबई पोर्ट ट्रस्ट व न्हावा शेवा येथील जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट ही दोन मोठी बंदरे आहेत. शासनाने खासगी क्षेत्राच्या सहकार्यातून ४८ लहान बंदरे विकसित करण्याचे निश्चित केले आहे.

महाराष्ट्र हे भारतातील एक विकसित राज्य मानले जाते. औद्योगिकदृष्ट्या महाराष्ट्र पहिल्या क्रमांकाचे राज्य असले तरी अनेक बाबतीत महाराष्ट्राच्या विकासविषयक आकडेवारीचे तुलनात्मक मानक म्हणून संदर्भ दिले जातात. परंतु असे असले तरी महाराष्ट्राचे विकासविषयक चित्र एकात्म नाही. म्हणजेच प्रादेशिकदृष्ट्या संपूर्ण महाराष्ट्राचा विकास एकसारखा नाही. त्यात मोठ्या प्रमाणावर प्रादेशिक विषमता आढळते. आजही भारतात ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे. बहुसंख्य ग्रामीण जनतेची उपजीविका प्राथमिक क्षेत्राशी निगडित आहे. सुमारे ५५ ते

६० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. संपूर्ण भारताची सर्वांगीण प्रगती मुख्यत्वे ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण उन्नतीवरच अवलंबून आहे. महाराष्ट्राच्या बाबतीतही सर्वसाधारणत: असेच चित्र आहे म्हणूनच ग्रामीण विकासाचा विचार मध्यवर्ती ठेवून शासनाचे रोजगार हमी योजना (१९७२-७३), संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (१५ ऑगस्ट २००१), महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (२००६) याचबरोबर ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाच्या संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा, म. गांधी तंटामुक्त गाव मोहीम इ. ग्रामीण विकासाच्या योजनांच्या माध्यमातून विकास करीत आहेत. तसेच स्थानिक पुढाकारातून शासनाच्या साहाय्याने विविध प्रकारची ग्राम विकासाची प्रारूपे पुढे आली आहेत. जलसंधारण, मृदासंधारण, जंगलाचे संरक्षण, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, सेंद्रिय शेती, नेत्रदान, दलित वस्ती सुधारणा अशा विविध क्षेत्रांत प्रयोग पुढे आले आहेत.

''महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही केंद्रीय नियोजनाचा भाग आहे. केंद्र शासनाने वेळोवेळी दिलेली अनुदाने अंजदापत्रकातील तरतुदी, कराचा वाटा यावर महाराष्ट्राचा विकास अवलंबून आहे. पंचवार्षिक योजनेच्या उद्दिष्टांचे ध्येय गाठणे हा पण एक अर्थव्यवस्थेचा मूलभूत भाग आहे. केंद्रीय स्तरावरील नियोजन आयोगाप्रमाणे राज्यानेसुद्धा केंद्रीय नियोजन आयोगाप्रमाणे राज्यस्तरावर राज्य नियोजन आयोगामार्फत विकास आराखडा तयार होत असतो. ''सध्या महाराष्ट्राची ११ वी पंचवार्षिक योजना (२००७-१२) या कालावधीमकरिता राबविली जात आहे. 'रोजगाराभिमुख संतुलित विकास' हे या योजनेचे शीर्षक असून राज्याने आर्थिक वृद्धीदराचे उद्दिष्ट १० टक्के ठरविले आहे. या योजनेत जलसंधारणाला अतिप्राधान्य देण्यात आले आहे. याचबरोबर सन २०१२ पर्यंत सर्व मुलांना शिक्षण देणे व गळती रोखणे, दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण ८ टक्क्यांवर आणणे इ. उद्दिष्ट निर्धारित केले आहे.''[१९]

## २.४ महाराष्ट्राचे सांस्कृतिक विश्व :-

एखाद्या देशाचा किंवा समाजाचा विकास हा तेथील आर्थिक प्रकारांवर अवलंबून असतो. या प्रकारात तसा विकासात्मक बदल होत जातो. त्याचप्रमाणे समाजात बदल होणे अपेक्षित आहे. प्राचीन काळातील दक्षिणेकडील यादवांचे राज्य, विजयनगराचे साम्राज्य व बहमनी राजवट यांच्या काळात महाराष्ट्रात होत असलेल्या सांस्कृतिक विकासात मराठी साहित्याचा विकास व वारकरी संप्रदायाची चळवळ हे महत्त्वाचे पैलू आहेत. ''प्रथमत: महाराष्ट्र नावाच्या उत्पत्तीबद्दल वेगवेगळी मते मानली जातात. पण 'महाराष्ट्री' या शब्दातून (महाराष्ट्री- महरट्‌टी - मऱ्हाठी- मराठी) यापासूनच 'मराठी' शब्द विकसित झाला. सातव्या शतकात शब्दरूपाने आढळणाऱ्या मराठी भाषेला यादवांच्या काळात लोकभाषेचे स्वरूप येऊन तिला राजमान्यता मिळाली. आद्यकवी मुकुंदराज यांनी इ.स. ११८८ मध्ये 'विवेकसिंधू' हा मराठी भाषेतील पहिला ग्रंथ लिहिला असे मानले जाते, तर तेराव्या शतकात महानुभाव पंथाची शिकवण सांगण्यासाठी श्री. चांगदेव राऊळ, श्री. गोविंद प्रभू, श्री. चक्रधर स्वामी, श्री. नागदेवआचार्य इत्यादींनी मराठी भाषेत साहित्याची भर घातली.''[२०] महाराष्ट्र ही संतांची भूमी, महानुभाव, नाथ, वारकरी, दत्त समर्थ या विविध संतानी, संप्रदायांनी आपआपल्या परीने महाराष्ट्रात भक्तिमार्गाची जोपासना केली. यातून विविध संतानी बहुमोल कार्य केले. वारकरी संप्रदायातील ज्ञानेश्वरांपासून वारकरी संप्रदायाचा कळस ठरलेल्या तुकारामांपर्यंत व समर्थ रामदासांनी जे कार्य केले. त्याचा महाराष्ट्रावर विविधांगी प्रभाव पडला. त्यामुळे मराठी माणसांची मने जोडण्याची व एकात्मता वृद्धिंगत करण्याचे महान कार्य या संतानी केले.

प्राचीन काळापासून कलेला मानवी जीवनात, संस्कृतीत एक अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. एक अतिशय महत्त्वाचे मनोरंजनाचे साधन म्हणून कलेकडे पाहिले जाते. मानवी कला म्हणजेच त्यात संगीत, नृत्य, गायन, चित्र या कलांचा समावेश होत असून त्यांचा विकास हा मानवावरच अवलंबून असे. रा. ग. गडकऱ्यांनी

महाराष्ट्राचे वर्णन ‘कणखर देशा, दगडांच्या देशा, महाराष्ट्र देशा’ असे केले होते. रणांगणावर वीर पुरुषांच्या पराक्रमाला जितके महत्त्व होते तितकेच या कलेलाही महत्त्व आहे. महाराष्ट्र राज्याला निरनिराळ्या कलांची मोठ्या प्रमाणत परंपराच जणू लाभलेली असल्याचे आपणास त्यांच्यात होत जाणाऱ्या विकासावरून दिसून येते. आदिवासी जमात जरी म्हटले तरी त्यादेखील नृत्य, गायन व संगीत यांना ते अनन्यसाधारण महत्त्व देतात. या सादरीकरण कलेमध्ये नृत्य, नाटक, चित्रपट, सीत व लोककला या अनेक प्रकारच्या कलांचा समावेश होतो. त्यातील वेगवेगळ्या कलांचे विवेचन आपण पुढे बघू या.

मानवी सामाजिक संस्कृतिक एक अतिशय महत्त्वाची कला म्हणजे नृत्य कलेकडे पाहिले जाते. मध्ययुगीन काळात इस्लाम धर्मानुसार वागणाऱ्या सुलतानांनी या कलेस विरोध केला. पुढे चालून नृत्य कलेला वाव मिळाला नवाब, उमराव, सरदार, श्रीमंत लोकदेखील अशा नृत्यांचा खासगी कार्यक्रम अयोजित करत असत. पुढे हिंदू-मुस्लिमांनी नृत्यकला, संगीतकला यांना वाव दिला. भारतातदेखील नृत्यकला म्हटले तरी काही विशिष्ट राज्यांत काही विशिष्ट नृत्ये प्रसिद्ध आहेत. त्यात प्रामुख्याने बघायचे झाल्यास कथ्थक, कथकली, मणिपुरी, भरतनाट्यम या नृत्यांचा विकास त्या त्या राज्यात झालेला आपणास पाहावयास मिळतो. आदिवासी जमातीतील लोक मुलांचा जन्म, वेगवेगळे सण व उत्सव, विवाह या शुभप्रसंगी विविध नृत्ये सादर करतात. ‘‘महाराष्ट्रात कोकण विभागात राहत असलेल्या कोळी लोकांचे ‘कोळीनृत्य’ अतिशय प्रसिद्ध आहे. या कोळी लोकांच्या नृत्याप्रमाणे धनगरांचे गजे नृत्य की, ज्यामध्ये हे लोक ढोल, झांज, सनईचा वापर करून आपले नृत्य सादर करतात. याचप्रमाणे लेझीम नृत्य व लावणी हेदेखील महाराष्ट्रीयन नृत्यांमध्ये अतिशय प्रसिद्ध नृत्ये आहेत.’’[२१]

मानवी जीवनात पूर्वीपासूनच नाटकास अनन्यसाधारण महत्त्व आहे. महाराष्ट्रीयन माणसास ‘नाटकप्रिय’ म्हटले जात होते. ‘नाटककला’ या नावाने ओळखली जाणारी नाटकांची संकल्पना ही लोकमान्यता पावलेली कला आहे. विसाव्या शतकाच्या

सुरुवातीस लोकांना भुरळ घालणारी एक कला म्हणून नाट्यकलेकडे पाहिले जाऊ लागले होते. विसावे शतक म्हणजे रंगभूमीचे असे पर्व होते की, जणू अनेक साधनांच्या होत गेलेल्या विकासामुळे जुने कलाप्रकार मात्र काहीसे मागे पडू लागले होते. ''नाट्यकलेची परंपरा या महाराष्ट्रात रूजविण्याचे महत्त्वाचे कार्य केले ते विष्णुपंत भावे यांनी 'सीता-स्वयंवर' की जे पूर्णपणे पौराणिक कथेवर आधारित नाटक म्हणून पहिल्यांदा सादर केले तसेच गोविंद देवल यांचे 'संशयकल्लोळ', 'शापसंभ्रम', 'झुंजारराव' ही नाटके तसेच श्रीपाद कोल्हटकरांचे 'मूकनायक', 'मतिविकार' अशी नाटके तयार केली गेली. महाराष्ट्रातील नाटकराव म्हटले की त्यात माधव जोशी, खाडीलकर, गडकरी, फाटक, वि. गुर्जर, वि. शेडेकर, वि.स. खांडेकर, ना.सी. फडके या ज्येष्ठ नाटककारांचा समावेश होतो.''[२२] नाटककारांच्या नव्या पिढींचा उगम झाला तो स्वातंत्र्योत्तर काळातच वि. वा. शिरवाडकर, वसंत कानेटकर, श्री. ना. पेंडसे, तेंडुलकर, पु. ल. देशपांडे याखेरीज बन प्रभू, श्याम फडके, वसंत सबनीस, रवींद्र भट इ. नाटककारांचा समावेश होतो.

मानवी जीवनात कलेला जितका वाव आहे. तितकेच त्यांच्या विविध शाखांनाही तितकेच महत्त्व प्राप्त झाल्याचे आपणास दिसून येतो. यामध्ये महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्रात चित्रपटाची सुरूवात मूकपट चित्रपटानेच झाली. 'श्यामची आई' हा मराठी चित्रपट आचार्य अत्र्यांनी जेव्हा प्रदर्शित केला तेव्हा हा चित्रपट राष्ट्रपती सुवर्ण पदकाचा मानकरी ठरला. दादासाहेब फाळके यांना मराठी चित्रपट सृष्टीत 'चित्रपट सृष्टीचा निर्माता' म्हणून ओळखले जाते. मराठी चित्रपट सृष्टीची सुरुवात मात्र पौराणिक कथेवरून झाली. 'राजा हरिश्चंद्र', 'सत्यवान सावित्री', 'लंकादहन' की जे रामायणावर आधारित 'श्रीकृष्ण जन्म' की जे श्रीकृष्णाच्या वेगवेगळ्या लीलांवर आधारित होते. लघुपट व नंतर 'अयोध्येचा राजा', 'संत तुकाराम', 'शेजारी' यासारख्या बोलपट चित्रपटांनी मराठी चित्रपटसृष्टीस सुरूवात झाली. चित्रपट निर्मिती करताना कथा, पटकथा, संगीत दिग्दर्शक, गीतकार,

निर्माते यासारखे कलाकार आपले तन-मन-धन ओतून त्या क्षेत्रात काम करत असतात. यात नाव घ्यायचे झाले तर ग. दि. माडगूळकर, पु. ल. देशपांडे, जगदीश खेबुडकर, सुधीर फडके, राम कदम, आचार्य, अनंत माने, दत्ता डावजेकर, वसंत प्रभू, शांताराम आठवले इत्यादींची या चित्रपट सृष्टीत महत्त्वाचे योगदान केले आहे.

मानवी सांस्कृतिक तसेच कलेच्या जगतात संगीतासही महत्त्व आहे. पूर्वीच्या काळीदेखील विजयनगरच्या राजांनी संगीतास आश्रय दिलाच होता. सुलतान कालखंडातील अमीर खुस्रो हा मोठा संगीतज्ज्ञ होता. गोपालनायक हा हिंदू गायक अतिशय प्रसिद्ध होता. संगीत ही फार काळापासून चालत आलेली व महाराष्ट्राला लाभलेली देणगीच होय. संगीताचे प्रामुख्याने प्रकार पाहावयास गेले तर हिंदुस्थानी संगीत, कीर्तन, नाट्यसंगीत की ज्यामध्ये सिनेमांतील संगीत, लोकसंगीत, पोवाडा, लावणी इत्यादीचा समावेश होतो. सुरुवातीस नाट्यसंगीतानंतर चित्रपट संगीतास महत्त्व प्राप्त झाले. त्याचबरोबर सिनेसंगीतात गाणी गाणारे गायक व गायिकाही तितक्याच महत्त्वाच्या ठरतात. यामध्ये आवाजाची छाप सोडलेले गायक यात सुधीर फडके, सुरेश वाडकर, किशोर कुमार, मोहम्मद रफी, अलका याज्ञिक, साधना सरगम, हृदयनाथ मंगेशकर यांचा तर गायिकांमध्ये सूरसम्राज्ञी लता मंगेशकर, आशा भोसले, उषा मंगेशकर, अनुराधा पौडवाल यांचा समावेश होतो. यांनी संगीतास अनेक अजरामर गाणी सादर केली व एक प्रकारे चित्रपट प्रसिद्धीस आणण्याचे कार्य त्या सिनेमातील गाण्यानेच होते.

''मराठी समाज जीवन जगत असताना उत्सवांना एक विशेष स्थान प्राप्त झाले आहे. सण व उत्सव यांना धर्मानुसार एक विशिष्ट दिवशी साजरी करण्याची रीत आहे. सण हे धार्मिक भावनेतून साजरे केले जातात. उत्सव मात्र सार्वजनिक लोकांच्या सहभागातून साजरे केले जातात. सण व उत्सव म्हटले की, त्यात प्रमुख सणाचा समावेश होतो. त्यात गणेश उत्सव, दुर्गा उत्सव, ईद, दसरा, दिवाळी, मकर संक्रांत, होळी,

बेंदूर, गुढी पाडवा इ. सार्वजनिक सणांचा समावेश होतो. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यामध्ये विविध धर्माचे लोक आपले धार्मिक सण मोठ्या आदराने शांततेने साजरे करतात.''[२३] या मागचा एकच उद्देश असतो की, सर्व लोक एकत्र यावेत व 'हम सब एक है' या भावनेने प्रेरित व्हावेत.

महाराष्ट्र शासनाने नुकतेच आपले सांस्कृतिक धोरण जाहीर केले आहे. आ. ह. साळुंके यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या सांस्कृतिक धोरण मसुदा समितीने या सांस्कृतिक धोरणाचा मसुदा जानेवारी २०१० मध्ये व्यापक चर्चेसाठी सादर केला होता. त्यावर महाराष्ट्रातल्या व्यक्ती व संस्थांकडून सूचना मागवण्यात आल्या. मुळात या सांस्कृतिक धोरणामागच्या भूमिकेत संस्कृतीची व्याख्या करताना संस्कृतीच्या भौतिक अंगांवर जास्त भर दिला आहे. समाजाची विचारसरणी, मूल्यव्यवस्था, सामाजिक व्यवहार व सामाजिक आर्थिक संबंधांचे नीतिनियम इत्यादी संस्कृतीच्या आत्मिक पैलूंना संस्कृतीचा प्रमुख अंग मानलेले नाही. त्या संदर्भातील काही उल्लेख या धोरणात आहेत पण ठोस भूमिका व उपक्रम मांडलेले नाहीत. त्यामुळे आज समाजामध्ये प्रभुत्वात असलेल्या ब्राह्मण्यवादी व विषमता समर्थक सांस्कृतिक मूल्यांच्या विरोधात शासनाचे धोरण व कार्यक्रम काय व कसा असणार हे या सांस्कृतिक धोरणात स्पष्टपणे पुढे येत नाही. उदा. जातीव्यवस्था, धर्म, पुरुषसत्ताकता, अंधश्रद्धा, सामाजिक-आर्थिक विषमतेतून निर्माण होणारी उचनिचता इ. संस्कृतीच्या महत्त्वाच्या पैलूंबाबत पुरेशी स्पष्ट भूमिका आणि ठोस कार्यक्रम वा उपक्रम या धोरणात नाहीत. भाषा, साहित्य, संगीत व विविध कला एवढीच संस्कृतीची प्रमुख अंगे आहेत, असे गृहीत धरून त्याबाबत मात्र अत्यंत विस्ताराने भूमिका व व्यापक कार्यक्रम वा उपक्रम या सांस्कृतिक धोरणात मांडलेले आहेत व ते स्वागतार्ह आहेत.

## २.५ महाराष्ट्राचे राजकीय विश्व :-

''महाराष्ट्र या घटक राज्यांची कार्यकारी सत्ता राज्यपालपदाकडे सोपविली आहे. राज्याचा सर्व कारभार राज्यपालाच्या नावे चालविला जातो. घटनेतील कलम १५२-१६३ या कलमांमध्ये राज्यपाल पदाविषयी तरतुदी देण्यात आल्या आहेत. राष्ट्रपती पदाप्रमाणेच राज्यात राज्यपाल हा घटनात्मक प्रमुख असतो. त्यांच्या पदाचा कार्यकाल ५ वर्षे इतका आहे. मात्र हा कार्यकाळ राष्ट्रपतीच्या मर्जीवर अवलंबून आहे. कलम १५५ नुसार राष्ट्रपती राज्यपालाची नियुक्ती करतात.''[२४] घटक राज्यातील सर्व कार्यकारी अधिकार राज्यपालावर सोपवण्यात आलेले असतात. मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने या अधिकारांचा वापर करण्याचे बंधन त्यांच्यावर असते.

महाराष्ट्र राज्यात द्विगृही विधिमंडळ आहे. यामध्ये विधानसभा हे कनिष्ठ सभागृह म्हणून तर विधान परिषद वरिष्ठ सभागृह म्हणून ओळखले जाते. घटनेच्या कलम १६८ नुसार प्रत्येक घटक राज्याच्या विधिमंडळात राज्यपाल आणि एक किंवा दोन सभागृहांचा समावेश केला आहे. ''द्विगृही विधिमंडळ फक्त महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश, बिहार, जम्मू काश्मीर, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू या सात घटक राज्यांतच आहे. विधिमंडळाचे कनिष्ठ सभागृह असलेल्या विधानसभेत जनतेने निवडलेले प्रतिनिधी असतात. प्रत्येक नवीन मतदार पुनर्रचनेनुसार एक प्रतिनिधी निवडला जातो. मात्र सदस्य संख्या ५१० पेक्षा जास्त व ६० पेक्षा कमी असता कामा नये. महाराष्ट्राच्या विधानसभेत प्रौढ मताधिकार पद्धतीने २८८ विधानसभा सदस्यांची निवड केली जाते व ८४ व्या घटना दुरुस्तीनुसार ही सदस्य संख्या २०२६ सालापर्यंत निश्चित करण्यात आली आहे.''[२५] याचबरोबर घटक राज्याच्या घटनात्मक प्रमुखाला (राज्यपाल) सल्ला देण्यासाठी व त्यांच्या कार्यात मदत करण्यासाठी मुख्यमंत्र्याच्या नेतृत्वाखाली एक मंत्रिमंडळ असेल अशी घटनेत तरतूद करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्याची नेमणूक राज्यपाल करतात तसेच मुख्यमंत्र्याच्या सल्ल्याने मंत्र्यांची नेमणूक केली जाते. मुख्यमंत्री

हे पद वास्तविकदृष्ट्या मध्यवर्ती असते. मुख्यमंत्र्याचा कालावधी सर्वसाधारणत: पाच वर्षांचा असून विधानसभेचा विश्वास असेपर्यंतच तो पदावर राहू शकतो. महाराष्ट्र राज्यातील मंत्रिमंडळाचे तीन स्तर आहे. यामध्ये प्रामुख्याने कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री असे आहेत. मंत्रिमंडळाचा आकार ठरवण्याचा अधिकार मुख्यमंत्र्याला होता. मात्र ९७ व्या घटनादुरुस्तीने विधानसभा सदस्यांचा १५ टक्के इतकेच मंत्रिमंडळ सदस्य असावेत असे बंधन निश्चित केले आहे.

''राज्याचा राजकीय प्रमुख मुख्यमंत्री असतो तर प्रशासकीय प्रमुख मुख्य सचिव असतो. राज्यातील सर्व सचिवाचे प्रमुख 'मुख्य सचिव' असतात. प्रशासकीय व्यवस्थेचे नेतृत्व मुख्य सचिव करत असतात. राज्य पातळीवरील प्रशासन आणि जिल्हा पातळीवरील प्रशासन यांच्यामध्ये समन्वयासाठी व प्रशासकीय कामकाजाच्या सोयीसाठी राज्याचे प्रशसकीय विभाग पाडले जातात. महाराष्ट्रामध्ये ७ प्रशासकीय विभाग आहेत. यामध्ये १) मुंबई विभाग, २) नाशिक विभाग, ३) पुणे विभाग, ४) औरंगाबाद विभाग, ५) अमरावती विभाग, ६) नागपूर विभाग अशी रचना करण्यात आली आहे. तसेच प्रशासकीय विभागासाठी एक विभागीय आयुक्त म्हणून भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची नेमणूक होते. जिल्हा हा भारतीय प्रशासकीय व्यवस्थेचा मूलभूत घटक आहे. या क्षेत्रातील सार्वजनिक व्यवहारांचे व्यवस्थापन म्हणजे जिल्हा प्रशासन होय. जिल्हा प्रशासनाच्या प्रमुखपदी जिल्हाधिकारी असतो. जिल्हाधिकारीपदी भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते. ही निवड केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत निवड केली जाते. राज्यसेवेतील अधिकारी बढतीद्वारे पदावर नियुक्त केले जातात.''[२६]

मनुष्यबळ विकास हे महाराष्ट्राचे परंपरागत शक्तिस्थान आहे. यासाठी शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण संस्था महाराष्ट्रात कार्यरत आहे यामध्ये 'यशदा' म्हणजेच यशवंतराव चव्हाण प्रशासन विकास संस्था ही पुण्यात आहे.

यामार्फत प्रशासन विकासाच्या नवीन क्षेत्रात विकास घडवून आणणाऱ्या शिखर संस्थेचे स्वरूप संस्थेस देण्यास आले आहे. तसेच महाराष्ट्र पोलिस ॲकॅडमीची स्थापना १९०६ मध्ये झाली. प्रथमत: पुण्यात 'पोलिस ट्रेनिंग स्कूल' या नावाने झाली होती. नाशिक येथे इमारत व पायाभूत सुविधा उपलब्ध असल्यामुळे १९०८ मध्ये स्कूलचे स्थलांतर नाशिक येथे करण्यात आले. यामार्फत पोलिस विभागातील उपअधीक्षक, उपनिरीक्षक या दर्जाच्या अधिकाऱ्यांना येथे प्रशिक्षण दिले जाते. महाराष्ट्रातील पंचायत राज निर्मितीचे श्रेय वसंतराव नाईक यांना जाते. "१ मे १९६० रोजी मराठी भाषिकांचे संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आले. यानंतर राज्यात पंचायत राज व्यवस्थेच्या स्वीकाराबाबत कार्यवाही सुरू झाली. बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशी महाराष्ट्राच्या संदर्भात कशा लागू करता येतील यासाठी २७ जून १९६० रोजी महाराष्ट्र शासनाने तत्कालीन महसूलमंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. त्यांच्या शिफारशीवरूनच महाराष्ट्रात त्रिस्तरीय पंचायतराज पद्धतीची स्थापना करण्यात आली. तसेच वेळोवेळी यामध्ये बदल व पुनर्विलोकनासाठी शासनाने बोंगीरवार समिती (१९७०), पी.सी. पाटील समिती (१९८४) स्थापन करून त्यांच्या शिफारशींची दखल घेतली आहे. याचबरोबर ७३ वी व ७४ वी घटनादुरुती अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थेला तसेच पंचायत राज पद्धतीला घटनात्मक दर्जा देऊन आणखी बळकट केले."[२७]

संयुक्त महाराष्ट्र आपल्या स्थापनेचे ५० वे वर्षे साजरे करताना राज्याच्या विविध क्षेत्रांतील कामगिरीचे सिंहावलोकन करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण टप्पा ठरतो. पन्नास वर्षांच्या कालखंडात महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक स्थित्यंतरे झाली. काँग्रेस वर्चस्वाची पडझड होऊन राज्यातील एक ध्रुवीय राजकारण द्विध्रुवीय बनले. हिंदुत्ववादी शक्तीचा विस्तार आणि १९९५ मधील सत्तांतर, १९९९ मधील काँग्रेसमधील राष्ट्रवादी काँग्रेसची निर्मिती आणि २००६ मध्ये शिवसेनेतून मनसेची निर्मिती झाल्याने राज्यातील पक्षीय स्पर्धा अधिक गुंतागुंतीची व बहुपदरी बनली. काँग्रेस, राष्ट्रवादी,

शिवसेना, भाजप आणि मनसेशिवाय, भारिप, आरपीआय, शेतकरीकामगार पक्ष, बामसं असे अनेक छोटे-मोठे पक्ष राज्यात आपली ताकद आणि अस्तित्व टिकवून आहेत. अनेक पक्षांच्या अस्तित्वामुळे बहुपक्षीय राजकीय स्पर्धा आकारास आली असली तरी या बहुपक्षीय स्पर्धेतून दोन तुल्यबळ आघाड्यांचे राजकारण राज्यात स्थिरावताना दिसून येते. १९६० ते २०१० या संपूर्ण कालखंडातील राजकारणाचा ताळेबंद तीन टप्प्यांत मांडता येईल. यामध्ये १) काँग्रेस वर्चस्वाचे राजकारण (१९५६-१९७७), २) काँग्रेस व्यवस्थेची पडझड आणि हिंदुत्ववादी शक्तींचा उदय (१९७८-१९९५), ३) आघाड्यांच्या राजकारणाचा कालखंड (१९९५-२००९) या व्यवस्थेमध्ये महाराष्ट्राच्या राजकारणाची दिशा व विकास आपणास दिसून येईल.

**संदर्भ :-**

१) तुकाराम जाधव (२०११), महाराष्ट्र वार्षिकी २०११, प्रकाशक द युनिक ॲकॅडमी, शिरोळे रस्ता, पुणे, पृ. ३१३.

२) के. सागर (२०१०), 'असा हा महाराष्ट्र', प्रकाशक के' सागर, पुणे, पृ. ३.

३) तुकाराम जाधव (२०११), महाराष्ट्र वार्षिकी २०११, प्रकाशक द युनिक ॲकॅडमी, शिरोळे रस्ता, पुणे, पृ. ३१५.

४) उपरोक्त, पृ. ३१७.

५) उपरोक्त, पृ. ३१९.

६) ए.बी. सवदी (२०१०), 'द मेगा स्टेट महाराष्ट्र', प्रकाशक निराली, पुणे, पृ. ७३.

७) उपरोक्त, पृ. ६३.

८) उपरोक्त, पृ. ६६.

९) तुकाराम जाधव (२०११), महाराष्ट्र वार्षिकी २०११, प्रकाशक द युनिक ॲकॅडमी, शिरोळे रस्ता, पुणे, पृ. १६५.

१०) उपरोक्त, पृ. १६६.

११) उपरोक्त, पृ. १६८.

१२) उपरोक्त, पृ. १७०.

१३) उपरोक्त, पृ. ६३५.

१४) ए.बी. सवदी (२०१०), 'द मेगा स्टेट महाराष्ट्र', प्रकाशक निराली, पुणे, पृ. २१३.

१५) उपरोक्त, पृ. २१८.

१६) लोकराज्य (२००९), प्रकाशक, महाराष्ट्र शासन, पृ. २४.

१७) उपरोक्त, पृ. २६.

१८) श्री. दत्ता सांगोलकर (२०११), चालू घडामोडी २०११, जिज्ञासा प्रकाशन, पुणे पृ. ४१.

१९) उपरोक्त, पृ. ८७.

२०) प्रा. ए. वाय. कोंडेकर (२००७), इतिहास सामान्य अध्ययन १, निराली प्रकाशन, पुणे, पृ. ६१.

२१) उपरोक्त, पृ. ६२.

२२) उपरोक्त, पृ. ६३.

२३) उपरोक्त, पृ. ६४.

२४) प्रा. बी. वाय. कुलकर्णी (१९९७), भारतीय शासन आणि राजकारण, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, पृ. ५४.

२५) तुकाराम जाधव (२०११), महाराष्ट्र वार्षिकी २०११, प्रकाशक द युनिक ॲकॅडमी, शिरोळे रस्ता, पुणे, पृ. ५४८.

२६) उपरोक्त, पृ. ६४.